स्थायी समितीच्या **बुधवार दिनांक 27–01–2016** रोजी **दुपारी 03–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 7. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 8. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 9. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 10. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 11. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 15. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 16. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. श्रावण हर्डिकर, आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 543 :– प्रभाग क्र. 55 ब, बजाजनगर व लक्ष्मीनगर येथील मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण या कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रूपये 29,90,188/–रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करून या आर्थिक वर्षात पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत हॉट मिक्स विभागातर्फे हे काम करवुन तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 544 :–** प्रभाग क्र. १६ ब येथील तुळशीनगर, साईनगर,शांतीनगर येथे सिमेंट काँक्रीट रोडचे बांधकाम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रु. ४१,३०,२५८/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 545 :–** प्रभाग क्र. 20–ब, येथे आहूजा नगर येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 29,99,986/– रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासनाने सुचविल्या प्रमाणे प्रभाग क्र. 20–ब ऐवजी 1–ब या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 546 :–** प्रभाग क्र. 29 अ, हंसापुरी येथील गितांजली टॉकीज ते जुना भंडारा रोड पर्यंत सिमेंट काँक्रीट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु.49,92,609/– रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 679 व नवीन पद क्र. A42001470511 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम लघु निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 547 :–** प्रभाग क्र. 17 ब मधील लालगंज गुजरी येथे सी. सी. पेव्हमेन्ट रस्त्यांचे कामे करण्याचे कामास्तव तयार केलल्या रू. 41,48,000/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याच प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 548 :–** प्रभाग क्र. २४ मधील भिवसेनखोरी व सुरेन्द्रगड येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एस. के. गुरूबक्षाणी यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा ३.५५ प्रतिशत अधिक दराची रू. ३१,०६,१७२/– ची निविदा मंजूर करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 549 :–** प्रभाग क्र. 18 ब अंतर्गत उमाठेवाडी येथे सिमेंट काँक्रीट पेव्हेमेंटचे काम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रु. 49,90,837/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 550</u> :– प्रभाग क्र. 39 अ आणि ब महात्मा गांधी येथील कुंभारपुरा स्लम भागातील जागनाथ स्वामी रोड ते समाज मंदीर पर्यंतचा रस्ता व नवाबपुरा येथील ताज ट्रेडर्स, गंगाबाई घाट रोड ते दरगाह पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण व सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त 16 निविदापैकी मे. महादेव डी. सोमकुंवर यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.2 टक्के प्रतिशत ने कमी दराची रु. 29,63,877/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 551</u> :– प्रभाग क्र. 20 ब, भोसलेवाडी व लष्करीबाग येथे नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 31.88 टक्के कमी दराची रु. 34,05,996/– रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 552</u> :– प्रभाग क्र. ५४ अ व ब येथील अभ्यंकरनगर व सेवानगर येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा ३.९९ प्रतिशत अधिक दराची रू. ३१,१८,४४७/– ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 553</u> :– प्रभाग क्र. ४८ अ अंतर्गत रेशीमबाग येथील जुनी शुक्रवारी हेडगेवार बिल्डींग जवळील रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण 3 निविदाकारापैकी मे. पी.के.नगरारे कन्स्ट्रक्शन यांची प्रथम निम्नतम निविदा मूळ प्राकलनीय दरापेक्षा 3.5 टक्के अधिक दराच्या निविदा राशी रुपये 44,73,673/– रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 554</u> :– प्रभाग क्र. ४८ अ अंतर्गत रेशीमबाग येथील व्हॉली बॉल मैदानाला संरक्षण भिंत बांधण्याचे काम करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण १७ निविदाकारा पैकी मे. द्वारका कंन्स्ट्रक्शन यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा १९.८७ टक्के कमी दराच्या निविदा राशी रूपये २५,८६,५९८/– रकमेच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 555** :— प्रभाग क्र. ४८ अंतर्गत जुनी शुक्रवारी (रेशीमबाग) अ आणि उमरेड रोड ते ग्रेटनाग रोड (सिरसपेठ) येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी **मे. मुकेश कन्ट्रक्शन** यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा २.९१ **प्रतिशत अधिक दराची रू.** ३०,८७,२३४/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 556** :— प्रभाग क्र २२ अ मधील सदर व गिटटीखदान भागाचे रोडचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. एल. सी. गुरूबक्षाणी यांची निन्मतम निविदा मूळ प्राकलनीय दरापेक्षा ३.४२ अधिक दराची निविदा राशी रू. ३१,०१९२०/— ( एकतीस लक्ष एक हजार नऊशे वीस फक्त ) रक्कमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 557** :— प्रभाग क्र. १२ अ—ब, येथील वैशाली नगर घाट जवळ वैशालीनगर एन.आय.टी. ग्राउंड जवळ व बुनकर कॉलनी यथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी **मे. आर. एम.गोपलानी** यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा **३.९९** प्रतिशत ने अधिक दराची **रू. ३१,१९,६९२/— (एकतीस लक्ष एकोणवीस हजार सहाशे ब्यान्नव फक्त)** रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम फीक्स प्रायरीटी अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रू. ३०.०० लक्ष पर्यंत सीमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 558** :— प्रभाग क्र. 71 — अ अंतर्गत एम.आय.जी. कॉलोनी, त्रिमुर्तीनगर येथील विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त मे. M/s. Amrut Construction यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा राशी रूपये ४१,२०,०४९/— च्या दरापेक्षा ३.७७ प्रतिशतने अधिक दराची **रूपये ४२,७५,३७५/—** (अक्षरी बेचाळीस लक्ष पंच्याहत्तर हजार तिनशे पंच्याहत्तर रूपये फक्त) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 559** :— नागपूर शहरबसचे संचालन महानगरपालिकेद्वारे दि. ०९/०२/२००७ रोजीचे करारान्वये खाजगी ऑपरेटर मे. वंश निमय इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांना देण्यात आलेले असून त्यांचे स्वत:चे मालकीचे २३० बसेस व दि. ०३/०३/२०१० चे पुरवणी करारान्वये जे.एन. एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत मनपास प्राप्त २४० स्टॅन्डर्ड बसेसमार्फत शहरबसचे संचालन होणे अपेक्षित होते. मात्र, कराराला अनुसरून योग्य प्रकारे बस वाहतुकीचे संचलन होत नसल्याने प्रवाश्यांना असुविधा निर्माण झालेली आहे,

त्यातच ऑपरेटरमार्फत रॉयल्टी शासन रकम व इतर रकमेचा भरणा होत नसल्याने मनपाच्या वतीने ऑपरेटर शोकॉज टर्मिनेशन नोटीस देण्यात आले आहे. सध्या अस्तित्वात असलेली नागपूर शहरबस सेवा ही NCC (Net Cost Contract) तत्वावर आधारीत असून प्रवाशीभिमुख नसल्याने अकार्यक्षम ठरलेला आहे, तसेच यामध्ये प्रवाशी नागरिक यांचे कुठलेही दायित्व वाहतुकदाराकडे न राहता थेट मनपाकडे येत असल्याने, तत्कालीन मा. महापौर यांनी दि. १६/०९/२०१३ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे ठराव क्र. १५४ अन्वये सहा निर्देश दिलेत, त्यामध्ये नागपूर शहरातील नागरिकांना चांगली बस सेवा उपलब्ध करून दुसरे नविन ऑपरेटर आणण्याबाबत दिलेल्या निर्देशाला अनुसरून शहरबस परिवहन सुधारणेअंतर्गत मनपा प्रशासनामार्फत दि. ०७/०२/२०१३ व दि. ३०/०४/२०१४ रोजी स्थानिक, राज्य व राष्ट्रीय वर्तमानपत्रात EOI स्वारस्थ अभिव्यक्ती प्रसिध्द करण्यात आले होते.

मा. केंद्रीय मंत्री, (रस्ते, वाहतुक व परिवहन) यांचे दि. ०६/०२/२०१५ रोजीचे रविभवन येथील बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार, प्रदुषण विरहीत बसेस/अल्टरनेट फ्युल संचालित बसेस केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार खरेदी करण्याचे निर्देशित केले व याबाबतचा विस्तृत आराखडा (DPR) हा तांत्रिक सल्लागार यांचे मार्फत तयार करण्याचे सुचित केले. त्याअनुषंगाने, मे. DRA Consultants Pvt. Ltd. यांना याबाबत Quick Fisibility Report तयार करण्याचे दृष्टीने दि. ०९/०५/२०१५ रोजी परिवहन समितीने तसेच, दि. ११/०६/२०१५ रोजी स्थायी समितीने यास मान्यता प्रदान केली. शहरबस सेवेकरीता नविन ग्रीन बस व डिझेल बस खरेदी व IBTM (Integrated Bus Transport Management System) ऑपरेटरची नियुक्ती ही धोरणात्मक असल्याने आवश्यक मुद्यांसह हा ठराव महासभेसमक्ष निर्णयार्थ ठेवण्यात आलेला होता. यामध्ये नविन ऑपरेटर सेवा ही केंद्र शासनाचे धोरणानुसार GCC (Gross Cost Contract) या तत्वावर प्रस्तावित आहे.

महानगपालिकेच्या महासभेने दि. २१/०८/२०१५ रोजी ठराव क्र. १४४ अंतर्गत ५५ प्रदुषण विरहीत ग्रीन बसेस, तसेच ठराव क्र. १४५ अन्वये नविन १५० डिझेल बसेस व IBTM ऑपरेटरमार्फत संचलन याबाबत मान्यता प्रदान केली आहे. त्याअनुषंगाने, तांत्रिक सल्लागाराचे वतीने खालील नमुद तीन RFP (Request for Proposal) तयार करण्यात आलेत.

A) Selection of operator for Procurement and Operation of Green Buses 55 Nos. fully AC run on Bio-Ethanol fuel for Nagpur Urban Region.
B) Selection of operator – Operation, Procurement and Maintenance of 150 Diesel Buses for Nagpur Urban Region.
C) Selection of Integrated Bus Transport Management (IBTM) Operator for Project Development Servives for Public Bus service in Nagpur Urban Region.

त्याअनुषंगाने, ई—निविदा जाहिरात क्र. २६३/पी.आर., दि. १९/११/२०१५ रोजी अन्वये अनु क्र. (i) RFP (Green Bus) व जाहिरात क्र. २७०/पी.आर.,दि. २१/११/२०१५ रोजी अन्वये अनु क्र. (ii) RFP (Diesel Bus) राष्ट्रीय वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अनु क्र. (iii) RFP (IBTM Operator) बाबत, संभाव्य खर्चाचे आर्थिक विवरणासह प्रस्तावित GCC (Gross Cost Contract) या अंतर्गत संभाव्य

खर्च/उत्पन्नाकरीता परिवहन विभागाकडे स्वतंत्र फंड खाते नसल्याने मनपाचे 'सार्वजनिक परिवहन निधी कोष' तयार करण्यात येणार आहे व बस वाहतुकी अंतर्गत दैनंदिन जमा होणाऱ्या निधीचे Escrow Account मार्फत पुढे संचालन होणार आहे. त्याकरीता, स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतुद ठेवावी लागेल. परिवहन समितीचे स्वतंत्र अर्थसंकल्प अद्याप मंजूर झालेला नाही.

NCC (Net Cost Contract) रदद् करून GCC (Gross Cost Contract) तत्वावर शहरबस संचालन प्रस्तावित केल्यानंतर मनपाचा दरमाह सरासरी खर्च/उत्पन्न याबाबतचा तपशील तांत्रिक सल्लागाराने सादर केल्यानुसार विवरण पत्र खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र. | तपशील | दरमाह खर्च (सरासरी) | दरमाह उत्पन्न (सरासरी) | नफा/तोटा (सरासरी) |
|---|---|---|---|---|
| १) | डिझेल बस संचलन (रेडबस) | १४,३८,००,०००/— | ११,९४,०१,५३०/— | २,४३,९८,४७०/— तोटा प्रतिमाह |
| २) | इथेनॉल संचालित बस (ग्रीन ए.सी. बस) | २,६४,००,०००/— | २,९५,९४,९०८/— | ३१,९४,९०८/— नफा प्रतिमाह |
| ३) | आयबीटीएम ऑपरेटर | १६,५९,६१४/— | — | — |
| ४) | मनपा स्टॉफ व इतर खर्च | ५२,०७,२००/— | — | — |
| ५) | एकूण | १७,७०,८६,८१४/— | १४,८९,९६,४३८/— | २,८०,६९,५६२/— तोटा प्रतिमाह |

Note : - (1) Three RFP (Request for Proposal) expenditure approximate cost be included.
(2) DRA Consultants has quoted expected loss of approximate Rs. 2.81 Cr / Month, i.e. Rs. 32.12 Cr/year.

उपरोक्त दर्शविलेल्या तक्यानुसार याकरीता प्रस्तावित तिनही ऑपरेटर नियुक्ती खर्च व प्रस्तावित तिनही ऑपरेटरद्वारे सेवा संचलन सुरू झाल्यानंतर सुरवातीचे काही वर्ष सेवा पुर्णपणे प्रस्थापित होईपर्यंत तोटा येण्याची शक्यता आहे. तसेच सुरूवातीचे किमान ३ महिण्याची आगाऊ तरतुद 'सार्वजनिक परिवहन निधीकोष' यात मनपा मार्फत होणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त खर्चाची तरतुद ही मनपाच्या अर्थसंकल्पा मध्ये स्वतंत्रपणे होणे गरजेचे असल्याने व वित्तीय प्राधिकारिणी ही स्थायी समिती असल्याने उपरोक्त वरील सर्व बाबींना स्थायी समितीची वित्तीय मान्यता आवश्यक आहे. वरील नमुद A), B), C) या तिनही प्रकारच्या धोरणात्मक बाबींना परिवहन समिती व मनपा महासभा यांनी यापुर्वीच मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने, मनपाद्वारे GCC (Gross Cost Contract) तत्वावर शहरबस संचालन प्रस्तावित करण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 560</u> :— **प्रभाग क्र. २१ अ व ब** मधील जायका मोटर ते सेन्ट उरसुला शाळे पर्यंत डांबरीकरण करणे व गडडीगोदाम येथे मज्जीद जवळील भागात सी.सी. रस्ते तयार करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी **मे. मुकेश कन्ट्रक्शन** यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा **३.९१ प्रतिशत अधिक दराची रू. ३१,१६,५९१/—** ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 561</u> :— दक्षिण नागपूर विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्र.४९ येथील राजाबाक्षा मंदिर “ब” तिर्थक्षेत्र म्हणून विकसीत करण्यास्तव रू. ५,३७,३९,०८८/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच या कामास्तव मे. भिवगडे ॲड असोसिएशन यांची प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार म्हणून नेमणूक करणे त्याचप्रमाणे तिर्थक्षेत्रातील विकास कामास्तव म.न.पा.चे अंदाजपत्रकात नविन पद निर्माण करण्याच्या शिफारशीसह प्रस्ताव महापालिका सभागृहासमक्ष ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 562</u> :— प्रभाग क्र. 43, ब धावडे मोहल्ला, राजेंद्रनगर, भुतेश्वरनगर व शिवाजीनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरिता प्राप्त निम्नतम निविदाकार मे. एस.के.गुरुबक्षानी यांची प्राकलनीय दरावर कमी दरांची रु. 25,99,965/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001330802 मधून आर्थिक वर्ष 2015—16 मध्ये रु. 26.00 लक्ष राशीची तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

<u>ठराव क्रमांक 563</u> :— प्रभाग क्रं. ६२ ब येथील विठठ्ल नगर १ येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण ४ निविदाकारांपैकी मे. आर.एम. दयारमानी यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ३.६६ टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. ३१,७९,२२१ /— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 564</u> :— प्रभाग क्रं. ६२ अ अंतर्गत महालक्ष्मीनगर येथे पावसाळी पाईप लाईन टाकण्याचे कामास्तव रु. ३४,८२,६९३/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 565</u>** :– प्रभाग क्र. 57 अ+ब मधील कुकडे ले–आऊट, सुंदरबन व सुयोग नगर येथील रस्त्यांचे रूंदीकरण डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी में. मुकेश कंन्स्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 3.50 टक्के अधिक दराची निविदा रूपये 31,04,603/– ( रूपये एकत्तीस लक्ष चार हजार सहाशे तिन रूपये फक्त ) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न, तसेच हे काम फिक्स प्रायरीटी पद क्रमांक 682 (A22001330803) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च 29,99,616/– पर्यंत सीमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 566</u>** :– प्रभाग 43 अ/ब मधील नंदनवन झोपडपट्टी येथील श्री. कनोजे यांचे घरापासून विश्‍वशांती बुद्ध विहार पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याकरिता प्राप्त निम्नतम निविदाकार मे. आर.एस.नायडू यांची 1.11 टक्के कमी दराची रु. 29,66,521/– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001330803 मधून आर्थिक वर्ष 2015–16 मध्ये रु. 15.00 लक्ष प्रती नगरसेवक राशी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

**<u>ठराव क्रमांक 567</u>** :– येडलवाडी परीसर या ठिकाणी सतरंजीपुरा क्षेत्रीय कार्यालय व नागरी सुविधा केन्द्राच्या इमारतीच्या बांधकामाचे रू. ३,९२,२४,०७४/– रकमेच्या सुधारित प्राकलनास तसेच या कामाचे कंत्राटदार मे. अबरार अहमद, यांना त्यांचे मंजूर निविदा ( प्राकलनीय दरापेक्षा ०.५ टक्के कमी ) दराने वाढीव कामाचा रू. २,१६,१९८२३/– कार्यादेश निर्गमित करण्याचा तसेच पद क्र. ए–४ २९०१३७१३३९ (जुना पद क्र. ६३६) अंतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 568</u>** :– झोन क्र. ३ अंतर्गत प्रभाग क्र. ६७ (ब) अंतर्गत ओंमकार नगर चौक ते चिंतामणी नगर नं. २ पर्यंत प्रस्तावित सिमेंट रोड च्या दुभाजकावर ९ मी. ऑक्टोगोनल पोलवर २५० वॅट सोडियम व्हेपर फिटिंग लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रू. ४४,५१,०००/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 569</u>** :– झोन क्र. 68 अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण या कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रुपये 29,96,170/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन या आर्थिक वर्षात पद क्र. 680 (A42001374612) अंतर्गत काम करवुन तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 570</u> :– प्रभाग क्र. 46–ब, बाळाभाऊपेठ गृहनिर्माण सहकारी संस्था व यासीन मिया ले–आऊट येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. डि.सी. गुरुबक्षानी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.65 टक्के अधिक दराची रु. 36,19,019/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. कामाचा खर्च मंजुर प्रावधानापर्यंत सिमीत राहील. .

<u>ठराव क्रमांक 571</u> :– प्रभाग क्र. 72 अंतर्गत लक्ष्मीविहार येथील नाल्याची संरक्षण भिंतीचे काम करण्याच्या कामास्तव प्राप्त मे. M/s. Shrikrishna Mishra, यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा राशी रूपये 4055229/– च्या दरापेक्षा 18.87 प्रतिशतने कमी दराची रूपये 3290007/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 572</u>:– महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 चे कलम 95 अन्वये नागपूर महानगरपालिकेचे अंदाजपत्रक मा. आयुक्तांद्वारा स्थायी समिती द्वारा मंजूरी करीता सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सन 2015–2016 चे सुधारीत व सन 2016–2017 चे प्रस्तावित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून स्थायी समितीच्या मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नागपूर महानगरपालिकेचे सन 2015–2016 चे सुधारीत व सन 2016–2017 चे प्रस्तावित अंदाजपत्रक निगम आयुक्ताद्वारा स्थायी समितीस सादर केले. अंदाजपत्रकाचे आर्थिक परिस्थितीचे व भाषणाचे वाचन केले.

नागपूर महानगरपालिकेचे सन 2015–2016 चे आयुक्त यांचेद्वारे सादर केलेल्या सुधारीत व सन 2016–2017 चे प्रस्तावित अंदाजपत्रकात दुरुस्ती व फेरबदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना देण्यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच केलेल्या दुरुस्ती व फेरबदलास म.न.पा. महासभेसमोर मंजूरीसाठी शिफारस करण्यास्तव पाठविण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 573</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर